मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणीकरिता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक:-सौरप्र-२०१८/प्र.क्र.८७/ऊर्जा-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-२७ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा:</u>- १) शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१६/प्र.क्र.३५४/ऊर्जा-७, दि. १४ जुन, २०१७

<u>**प्रस्तावना:-**</u>

राज्यामध्ये ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषीक्षेत्राकरिता सुमारे ३०% ऊर्जेचा वापर होतो. प्रामुख्याने सदरच्या वीजेचा वापर कृषीपंपास वीज पुरवठा करण्यासाठी होत असून त्यामधून महावितरण कंपनीस महसूली तोटा सहन करावा लागतो. परंतु अशा परिस्थितीत देखील शेतकऱ्यांना माफक दरात वीज उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने त्याकरिता महावितरण कंपनीस शासनाकडून मोठया प्रमाणात दरवर्षी अनुदान देण्यात येते. तसेच महावितरण कंपनीकडून कृषी ग्राहकांचा वीज दर माफक ठेवण्यासाठी वाणिज्यिक व औद्योगिक वीज ग्राहकांकरिता क्रॉस सबसिडी रूपाने अधिक वीज दर आकारण्यात येतो. यास्तव राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोयीनुसार वीज पुरवठा उपलब्ध व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यात शासन निर्णय दि. १४ जुन, २०१७ अन्वये “मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना” सूरू करण्यात आली आहे.

सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यासाठी सदर दि. १४ जून, २०१७ च्या शासन निर्णयातील अनु.क्र.२३ अन्वये समिती गठीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना उदभवणाऱ्या अडचणींचा विचार करून अटी व शर्ती मध्ये सुधारणा वा बदल करण्याचे अधिकार सदर समितीस असणार आहेत.

यास्तव सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय:-**</u>

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यासाठी, योजनेअंतर्गत पथदर्शी दोन प्रकल्पाचे कार्यान्वय करतांना प्राप्त नित्कर्ष व अनुभव, योजनेची अंमलबजावणी करताना उदभवणाऱ्या/येणाऱ्या अडचणींचा विचार करून अटी व शर्तीमध्ये सुधारणा वा बदल करण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) समितीची रचना:-

१)	प्रधानसचिव (ऊर्जा)	अध्यक्ष
२)	व्यवस्थापकीयसंचालक, महावितरण कंपनी	सदस्य
३)	व्यवस्थापकीयसंचालक, महानिर्मिती कंपनी	सदस्य
४)	व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण	सदस्य
५)	महासंचालक,महाऊर्जा	सदस्य सचिव
६)	संचालक (प्रकल्प), महावितरण कंपनी	सदस्य
७)	संचालक (प्रकल्प), महानिर्मिती कंपनी	सदस्य

ब) समितीचे कार्य:-

१) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होत असल्याबाबतचा आढावा घेणे. असा आढावा किमान दोन महिन्यातून एकदा समितीकडून घेण्यात येईल.

२) सदर योजनेअंतर्गत वेळोवेळी आस्थापिन करण्यात येणाऱ्या प्रकल्पांचे कार्यान्वयन करतांना प्राप्त नित्कर्ष व अनुभव यांचा विचार करून योजनेत बदल वा सुधारणा करणे.

३) योजनेची अंमलबजावणी करताना उदभवणाऱ्या/येणाऱ्या अडचणींचा विचार करून अटी व शर्तीमध्ये सुधारणा वा बदल करणे.

४) सदर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणाना मार्गदर्शन व त्यांत समन्वय ठेवणे.

क) समितीची अधिकारिता:-

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेस मंत्रीमंडळाने मान्यता देताना दिलेल्या आदेशानुसार योजनेची अंमलबजावणी करताना उदभवणाऱ्या/येणाऱ्या अडचणींचा विचार करून अटी व शर्तींमध्ये सुधारणा वा बदल करण्याचे पूर्णत: अधिकार सदर समितीस राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०२२७१२२०२६४९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2018.02.27 12:22:29 +05'30'

(प्र.पुं.बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई,
४. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधान भवन मुंबई,
५. सर्व विधानमंडळ सदस्य,विधान भवन, मुंबई,

६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,सर्व मंत्रालयीन विभाग,
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या.,मुंबई,
१८.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१९.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२१. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
२२. सह सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३.श्री. सतिश चव्हाण, संचालक (वाणिज्य), महावितरण, मुंबई
२४.श्री. मुंडे, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२५.अतिरिक्त महासंचालक, महाऊर्जा
२६. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७.निवड नस्ती,ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.